# संत्रा

GVT कृषीकुल

**अधिक माहितीसाठी संपर्क:**
82 7373 3030/82 7373 3535

**पिकाचे नाव:** संत्रा
**शास्त्रीय नाव:** सायट्रस रेटिक्युलाटा
**कुळ:** रुटेसी
**लागवड अंतर:** 12 x 12 , 15 x 15, 18 x 18, 20 x 20 फूट
**वाण:** नागपूरी संत्रा, किन्नो.

**संत्र्याचे गुणधर्म:** संत्रा हे फळ जगभरातील सर्वात लोकप्रिय फळांपैकी एक आहे. हे फळ लिंबूवर्गीय प्रजाती खालील सुमारे 50% क्षेत्र व्यापते. व्हिटॅमिन सी' चा एक चांगला स्त्रोत असलेल्या या फळात वनस्पती संयुगे देखील आहेत, ज्यात दाहक-विरोधी अँटिऑक्सिडेंट गुणधर्म आहेत आणि अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. संत्रा पोटॅशियम आणि फायबरचा चांगला स्त्रोत आहे, जो हृदय आणि आरोग्यासाठी उपयुक्त आहे.
**माती:** चांगला निचरा होणारी हलकी चिकणमाती, मध्यम ते काळी माती ज्यामध्ये सामू हा 6.5 ते 7.5 एवढा आहे, अशा जमिनी संत्रा लागवडीसाठी योग्य आहेत. जर CaCo3 5-7% पेक्षा जास्त आणि विद्युत वाहकता 0.1% पेक्षा जास्त असल्यास अशा जमिनी संत्रा लागवडी साठी टाळाव्यात. संत्रा पीक चुनखडीयुक्त मातीसाठी अत्यंत संवेदनशील आहे, म्हणून या प्रकारची माती टाळावी, कारण मुळाच्या क्षेत्रामध्ये कॅल्शियम कार्बोनेटची उपस्थिती वनस्पतींच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम करु शकते.
**हवामान:** उपोष्णकटिबंधीय हवामान संत्रा लागवडीसाठी योग्य आहे. कमी तापमान आणि जास्त पाऊस झाडांना हानीकारक आहे. उन्हाळ्यात उष्ण वारा यांचा फुलांवर विपरीत परिणाम होतो आणि त्यामुळे फळगळतीची समस्या उद्भवते. संत्रा पिकाच्या लागवडीसाठी योग्य तापमान 25-30 डिग्री सेल्सिअस आणि वार्षिक पर्जन्यमान 75-180 सें.मी. पर्यंत झाडांच्या वाढीसाठी अनुकूल आहे.
**उत्पादन:** लागवडीनंतर 4-5 वर्षांनी उत्पादन सुरु होते आणि सरासरी उत्पादन 20 किलो/झाड मिळते. 5 व्या वर्षी प्रति झाड 50 फळे आणि 8 व्या वर्षापासून साधारण 700-800 फळे प्रती झाड उत्पादन मिळते.
**मुख्य कीटक:** नागअळी, पाने खाणारा सुरवंट, लाल कोळी माइट, खोडकिड, मावा, फळ शोषक पतंग, लिंबू फुलपाखरु, लिंबूवर्गीय सायला .
**मुख्य रोग:** डिंक्या, मर रोग, मूळ कुजणे, खैऱ्या, डिकलाईन



# संत्रा

## नागपूरी संत्रा

GVT कृषीकुल

**अधिक माहितीसाठी संपर्क:**
82 7373 3030/82 7373 3535

**वाण:** नागपूरी संत्रा
**लागवड तारीख:** 15/04/2023
**लागवड अंतर:** 10x15 फूट
**लागवड क्षेत्र:** 12 R
**रोपांची संख्या:** 90

**नागपुरी संत्र्याचे वैशिष्ट्य:** नागपूरी संत्रा हे जगातील सर्वोत्कृष्ट संत्र्यापैकी एक आहे, या जातीचे भारतीय बाजारपेठेतही प्रमुख स्थान आहे. त्याला पोंकण असेही म्हणतात. झाडे आकाराने मोठी, जोमदार आणि दाट पानांची असतात. फळांचा आकार मध्यम, गुळगुळीत पृष्ठभाग, आणि चकचकीत, पातळ, मऊ फळे. जास्त उत्पन्न देणारे वाण.

**उत्पादन:** लागवडीनंतर 5 वर्षांनी उत्पादन सुरु होते आणि 8 व्या वर्षापासून सरासरी उत्पादन स्थिर झाल्यानंतर प्रति झाड सुमारे 700-800 फळे मिळतात.



# संत्रा
## किन्नो

GVT कृषीकुल
अधिक माहितीसाठी संपर्क:
82 7373 3030/82 7373 3535

**वाण:** किन्नो
**शास्त्रीय नाव:** किंग(सायट्रस नोबिलिस ) x विलो (सायट्रस डेलिसिओसा )
**लागवड दिनांक:** 29/07/2023
**लागवड अंतर:** 10x15 फूट
**लागवड क्षेत्र:** 10 R
**रोपांची संख्या:** 78

**किन्नोचे वैशिष्ट्य:** जास्त उत्पादन देणारी जात, चांगली चव आणि रंग. रसाळ, कमी बियाचे प्रमाण असलेले मध्यम आकाराचे गोलाकार फळ. थंडी प्रतिरोधक वाण आहे. खोल पिवळसर केशरी, गुळगुळीत आणि चकचकीत पृष्ठभाग. कडक साल व कातडी. उशीरा येणारे वाण आहे.

**उत्पादन:** लागवडीनंतर 4-5 वर्षांनी उत्पादन सुरु होते, जानेवारी व फेब्रुवारीमध्ये पूर्ण परिपक्वतेवर कापणी करावी. सरासरी 70-80 किलो/झाड उत्पादनासह सरासरी 400-450 फळे मिळतात.

